# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

वनी क्रमांक. :
०–२५६०१२६४
२५६०१२६५
-मेल: pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

र्भ – साफुपुवि / निवषि / ४२१ दिनांक : ०१ / ०३ / २०१७

ति.
.प्राचार्य / संचालक,
र्व संबंधित संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थाना शैक्षणिक वर्ष सन २०१६–१७ मध्ये सौर ऊर्जा उपकरणे अर्थसहाय्य मंजुरीबाबत.**

महोदय / महोदया,

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था यांनी शैक्षणिक वर्ष सन २०१६–१७ मध्ये ऑनलाईन पध्दतीने सौर ऊर्जा उपकरणासाठी मार्गदर्शकतत्त्वांस अनुसरून प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशा महाविद्यालयांना / संस्थांना त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या रकमेस सोबत जोडत असलेल्या मार्गदर्शकतत्त्वास अनुसरून विद्यापीठ नियमाच्या अधिन राहून सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद केल्यानुसार त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर अर्थसहाय्य मंजूरी देण्यात येत आहे. अर्थसहाय्य मंजूरीची विद्यापीठ संकेतस्थळावरील यादी हीच मंजूरी समजण्यात यावी. अर्थसहाय्य मंजूरीची स्वतंत्र पत्रे पाठविण्यात येणार नाहीत.

आपल्या महाविद्यालय / संस्थेस जरी वरीलप्रमाणे अर्थसहाय्य मंजूरी देण्यात आली असली तरी प्रत्यक्ष कार्यवाही पुढील गोष्टींची पूर्तता झाल्यानंतरच रक्कम अदा केली जाईल.

१. महाविद्यालय / संस्थेस सौर ऊर्जा उपकरणे बसविण्याकरिता भेटी, प्रत्यक्ष पाहणी अहवाल, पडताळणी इत्यादिसाठी रु.५,०००/– मा.वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–७ यांचे नावाने एमएलसी कोड नं. १११०३७ (Charges for Proposal of solar Energy Equipment) डिपार्टमेंट कोड नं. ९४ वर चलन नंबर ५४ ने ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे.

२. सदरील रक्कम रु.५,०००/– प्राप्त झाल्यानंतर भेटीसंबंधीची आंतरशास्त्र ऊर्जा प्रणाली विभागाकडून पुढील कार्यवाही सुरु होईल. भेटी देण्याबाबत या दूरध्वनी क्रमांक ०२०–२५६०१४१५ / २५६९५२१०, भ्रमणध्वनी क्रमांक १. डॉ.संदेश जाडकर – ९७६५३६११२४ २. श्री.आदिनाथ फुंदे – ८२०८८३४६३३ वर संपर्क करावा.

३. सदरील विभागाकडून भेटीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच आगाऊ रक्कम देण्याबाबत विचार केला जाईल.

४. महाविद्यालय / संस्थेने एम.एन.आर.ई.कडून सौर ऊर्जा उपकरण बसविल्यानंतर आंतरशास्त्र ऊर्जा प्रणाली विभागाकडून काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयकाची अंतिम रक्कम अदा केली जाईल.